महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, पुणे.
(शिवनगर विद्या प्रसारक मंडळ आवार, माळेगांव (बु), ता. बारामती जि. पुणे.) ४१३११५
OFFICE OF THE DEAN,
GOVERNMENT AYURVED COLLEGE BARAMATI,PUNE.
Email- gacbaramati@gamil.com Mo-9822961494

जा.क्र.शाआमबा/लेखा/दरपत्रक/ ७०६ /२०२५ दिनांक:- ०७/०४/२०२५.

# दरपत्रक जाहीर सुचना

विषय :- वित्तीय वर्ष सन २०२५-२०२६ करिता पुरवठा दरांचे कपात करण्यात आलेल्या GST / TDS २ टक्के व 24Q and 26 Q , ई- फाईलिंग १६ फॉर्म ची कामे करुन मिळणेबाबतचे दरपत्रक सादर करणे बाबात

उपरोक्त विषयाबाबत शासन नियमानुसार या कार्यालयकडुन वेळोवेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन कपात करण्यात येत असलेल्या आयकर रकमांचे तसेच पुरवठादार/कंत्राटदार यांच्या वेतनातुन देयकातुन कपात केलेल्या आयकर/जी.एस.टी रकमांचे संबंधित शासकीय विभागास विहित online quartly/yearly returns व्दारे अहवाल सादर करणे आवश्यक असते.

यास्तव टॅक्स कन्सल्टंट यांचेकडुन सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात या महाविद्यालयाचे Income Tax/ GST/TDS online returns चे काम करणाऱ्या इच्छुक टॅक्स कन्सल्टंट यांचेकडुन सदर काम करण्यासाठीचे दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक कन्सल्टंट यांनी त्यांची दरपत्रके सिलबंद पाकिटामध्ये अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,बारामती यांचे कार्यालयात पोस्टाने अथवा समक्ष खालील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करावीत.

| अ.क्र | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दि. ०८.०४.२०२५ ते दि.१९.०४.२०२५ या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत,शासकीय व स्थानिक सुटटीचे दिवस वगळून (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) |

सदरच्या विहित GST / TDS २ टक्के २४ क्यु, ई- फाईलिंग १६ फॉर्म चे कामे तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | बाब | दर | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पुरवठादार/कंत्राटदार यांचे मासिक GST/TDS Online Returns and Challan तयार करुन देणे | मासिक | |
| २ | Income Tax त्रैमासिक तसेच नियमित कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांचे Online 24Q and 26 Q Submit करुन देणे | प्रति त्रैमासिक | |
| ३ | नियमित कर्मचारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे Form No.16 and Form no 16 A Part and B Part तयार करुन देणे (वार्षिक) | प्रति कर्मचारी | |

**अटी व शर्ती**

१. दिनांक १९.०४.२०२५ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रकाच्या पाकीटावर GST/TDS Online Returns and Challan चे दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

३. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये. आवश्यकत्या ठिकाणी दरपत्रकांवर दिनांक व ठिकाण स्पष्टपणे नमुद करावेत.

मागे.पहा..

४.दरपत्रक सादर करणाऱ्या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असुन नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील.याकरिता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील.( हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे.)

५. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे.दरत्रक सादर केलेल्या दरत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नसावा.तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

६. दरपत्रकासोबत पॅनकार्ड, आधार कार्ड, Business Registration Certificate, GST Certificate ची साक्षांकित झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक राहील.

७. दरपत्रकानुसार मंजूर करण्यात आलेल्या दराव्यतिरीक्त इतर कोणतेही दर देय होणार नाही.

८. शा.निर्णय उद्योग व उर्जा विभाग दि.०१.१२.२०१६ मध्ये नमूद केल्यानुसार पुरवठादाराच्या बाबतीत खरेदीच्या कोणत्याही टप्यावर अनियमितता/गैरप्रकार/नैतिक अधःपतन इतरही बाबी निदर्शनास आल्यास त्याबाबत शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

९.उपरोक्त Returns सादर करण्यासाठी दिलेल्या मुदतीतच व योग्य त्या कार्यपध्दतीनुसारच सदरचे अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

१०.आपल्या देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बॅक खात्यात जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बॅक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

११ अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती हे सदर दर पत्रक स्विकारणे, रद्द करणे, यशस्वी दरपत्रक स्विकारण्याच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखील कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्ती मध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

१२. सादर केलेले दर हे आर्थिक वर्ष सन २०२५-२६ साठी अनुदेय राहतील. त्याव्यतिरीक्त कोणतीही अतिरीक्त रक्कम दिली जाणार नाही.

१३. याबाबत संबंधित विभागाकडून काही आक्षेप असल्यास त्यांचे निराकारण करुन देण्याची जबाबदारी संबंधित टॅक्स कन्सल्टंटची राहील.

१४. वरील सादर करण्यासाठी आवश्यक माहिती वेळोवेळी कार्यालयाकडून मागवुन घेणे तसेच त्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणे आवश्यक राहील.

१५. ज्या टॅक्स कन्सल्टंट दर मान्य झालेले आहे त्यांनी देयक तीन प्रतीत महाविद्यालय कार्यालयास सादर करावे. कार्यालयास शासनाकडुन प्रत्यक्ष अनुदान उपलब्ध झाल्यानंतर देयकाची रक्कम अदा करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

(वैद्य.अनिल.भि.काळे)
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,बारामती